RNI No. MAHBIL /2009/35574

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-अ—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ३२] मंगळवार, जून ९, २०२६/ज्येष्ठ १९, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये १०.००

असाधारण क्रमांक ७५

प्राधिकृत प्रकाशन

(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ कोकण विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमान्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांजकडून

नगरपरिषद प्रशासन शाखा

संदर्भ : (१) आयुक्त तथा निवडणूक अधिकारी, वसई विरार शहर महानगरपालिका यांचेकडील पत्र जावक क्र. व.वि.श.म. /लेखा /२२५/२५-२६ दिनांक ३०/०३/२०२६.

(२) राज्य निवडणूक आयोग आदेश क्रमांक रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणीकरण कक्ष ब, दिनांक १५/०२/२०२४.

(३) या कार्यालयाचे सुनावणी नोटीस पत्र क्र. नपप्र/कार्या-२/अनर्ह करण्याबाबत/२०२६-२७/२६२, दिनांक १८/०५/२०२६.

(४) या कार्यालयात झालेली सुनावणी दिनांक ३०/०४/२०२६, दिनांक ०६/०५/२०२६ व दिनांक २५/०५/२०२६

आदेश

क्रमांक नपप्र/कार्या-२/अनर्ह करण्याबाबत/२०२६-२७/३३८.— वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ करिता एकूण ५४७ उमेदवारांनी निवडणूक लढविली होती. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व कायदेशीर तरतुदींनुसार निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने विहित मुदतीत आपल्या निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, संदर्भ क्र. १ मधील आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांच्या अहवालानुसार, खालील नमूद ७ उमेदवारांनी आपल्या निवडणूक खर्चाचा हिशोब विहित मुदतीत सादर केलेला नाही.

त्यामुळे संदर्भ क्रमांक २ येथील राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, सदर उमेदवारांना अनर्हत घोषित करण्यासाठीचा नमुना सहा मधील प्रस्ताव वसई विरार शहर महानगरपालिका प्रशासनाकडून या कार्यालयास सादर करण्यात आला होता.

सदर उमेदवारांना नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार आपली बाजू मांडण्याची संधी देण्यासाठी या कार्यालयात दिनांक ३०/०४/२०२६, दिनांक ०६/०५/२०२६ व दिनांक २५/०५/२०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीदरम्यान संबंधित उमेदवार हे अनुपस्थित राहिले. परिणामी, सदर उमेदवारांनी राज्य निवडणूक आयोगाच्या कायदेशीर आदेशांचे व तरतुदींचे उल्लंघन केले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मी, विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मला राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणीकरण कक्ष ब, दिनांक १५/०२/२०२४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १० (१ई) नुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ मध्ये निवडणूक लढवूनही विहित मुदतीत खर्चाचा हिशोब सादर न केल्याबद्दल, खालील तक्त्यात नमूद उमेदवाराला पुढील ३ (तीन) वर्षांच्या कालावधीसाठी महानगरपालिकेची निवडणूक लढविण्यास व महानगरपालिकेचा सदस्य होण्यास "अनर्ह" घोषित करण्यात येत आहे.

अ.क्र.	उमेदवाराचे नाव	प्रभाग समिती व प्रभाग क्रमांक
१	डॉ. राकेश सुरेंद्र कांबळे	प्रभाग समिती "सी", ४-ड
२	श्री. जोसेफ वर्गीस	प्रभाग समिती "डी", २२-डी
३	सौ. सुषमा प्रभुनाथ पांडे	प्रभाग समिती "एफ", १८-ब
४	सौ. कांचन रोहित यादव	प्रभाग समिती "एफ", १८-क
५	श्री. शाहिद कमाल शेख	प्रभाग समिती "एफ", १९-ड
६	श्री. मोहम्मद असरफ अख्तर खान	प्रभाग समिती "एफ", १९-ड
७	श्री. विशाल जाधव	प्रभाग समिती "जी", २१-अ

सदर अनर्हतेचा कालावधी हा आदेश जारी झाल्याच्या दिनांकापासून लागू राहील.

रुबल अग्रवाल (भा.प्र.से.),
विभागीय आयुक्त,कोकण विभाग.

दिनांक ८ जून २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.